"ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यासाठी शिक्षण प्रसार"

-शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे

श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था, कोल्हापूर संचलित

# विवेकानंद कॉलेज, (अधिकारप्रदत्त स्वायत्त)

## समाजशास्त्र विभाग

## सरप्राईज टेस्ट प्रश्नपत्रिका

B.A. II (NEP 2020) Sem III दि. 05/08/2024

---

**प्रश्न १. खालीलपैकी कोणत्याही एका प्रश्नाचे सविस्तर उत्तर लिहा.** (गुण १०)

१) लिंगभाव संकल्पनेचा अर्थ व स्वरूप सविस्तर स्पष्ट करा.

**किंवा**

२) महिलांच्या संदर्भातील कायदे सविस्तरपणे स्पष्ट करा.

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR (Empowered Autonomous) ESTD JUNE 1964

Scanned with OKEN Scanner

"ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यासाठी शिक्षण प्रसार"
-शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे

श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था, कोल्हापूर संचलित

# विवेकानंद कॉलेज, (अधिकारप्रदत्त स्वायत्त)

## समाजशास्त्र विभाग

दि. 05/08/2024

### Surprise Test Attendance

| अ.क्र. | विद्यार्थ्यांचे नाव | सही |
|---|---|---|
| १. | आरती रामचंद्र चौगले | Achougule |
| २. | आकांक्षा संतोष कदम | A.S.K. |
| ३. | निशिगंधा पिंटू लाड | N.P.L. |
| ४. | श्रद्धा राजकुमार शेळके | SRShelke |
| ५. | श्रेया संजय कोळी | SSKoli |

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR (Empowered Autonomous) ESTD JUNE 1964

श्री. ~~एस. व्ही. चामे~~
HEAD
DEPARTMENT OF SOCIOLOGY
VIVEKANAND COLLEGE, KOLHAPUR
(EMPOWERED AUTONOMOUS)

Scanned with OKEN Scanner

"ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यासाठी शिक्षण प्रसार"
-शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे

श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था, कोल्हापूर संचलित

# विवेकानंद कॉलेज, (अधिकारप्रदत्त स्वायत्त)

## समाजशास्त्र विभाग

दि. 05/08/2024

### Surprise Test Result

| अ.क्र. | विद्यार्थ्यांचे नाव | गुण |
|---|---|---|
| १. | आरती रामचंद्र चौगले | 06 |
| २. | आकांक्षा संतोष कदम | 06 |
| ३. | निशिगंधा पिंटू लाड | 06 |
| ४. | श्रद्धा राजकुमार शेळके | 05 |
| ५. | श्रेया संजय कोळी | 06 |

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR (Empowered Autonomous) ESTD JUNE 1964

श्री. एच. व्ही. चामे
HEAD
DEPARTMENT OF SOCIOLOGY
VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR
(EMPOWERED AUTONOMOUS)

Scanned with OKEN Scanner

Page No.
Date

06/10

Name - Nishigandha Pintu Lad
Subject - Sociology (SEC)
Roll - 4491
class : B.A 2nd year

दि. 05/08/2024

प्र. लिंगभाव संकल्पनेचा अर्थ आणि स्वरूप स्पष्ट करा.

→ • लिंगभाव संकल्पनेचा अर्थ :-

1] अॅन्थोनी गिडिन्स : लिंगभाव म्हणजे स्त्री-पुरुषामधील समाजाने संस्कृतीने निर्माण केलेले भेद होय. यामध्ये स्त्रीत्वाशी तसेच पुरुषत्वाशी निगडीत असलेल्या पारंपारिक आणि मानसशास्त्रीय घटकांचाही समावेश होतो.

2] जागतिक आरोग्य संघटना (WHO): लिंगभाव म्हणजे स्त्री-पुरुषांची समाजाने निर्माण केलेली वैशिष्ट्ये तसेच त्यांच्यासाठी योग्य मानलेल्या भूमिका वर्तनप्रकार आणि नियमने यांचा संच होतो.

3] याबरोबरच लिंगभाव ही संज्ञा स्पष्ट करण्यासाठी पुढे दिलेल्या आणखीन काही मुद्दयांचा समावेश समजून घेण्याच्या अनुषंगाने करता येईल.

1] लिंगभाव म्हणजे स्त्री-पुरुषात समाजाने, संस्कृतीने निर्माण केलेले भेद :

वस्तुत: स्त्री आणि पुरुष हे समाजाचे महत्वपूर्ण घटक आहेत. परंतु वर-वर पाहता या घटकाकडे समानतेच्या दृष्टीने पाहिले जाते. पण प्रत्यक्षात मात्र समाजाचा स्त्रियांकडे बघण्याचा दृष्टीकोन हा पुरुषांकडे पाहण्याच्या दृष्टीकोनापेक्षा भिन्न असतो. स्त्रियांची निसर्गत:च जैविक रचना, स्वभाव, त्यांनी करावयाची कामे वेशभुषा केशरचना याबाबतची सामाजिक मते तसेच पुरुषांनी करावयाची कामे, वेशभुषा, केशरचना याबाबतची सामाजिक मते खुपच भिन्न असतात. स्त्री-पुरुषांतील हा सामाजिक [illegible] सांस्कृतिक भेद म्हणजेच लिंगभाव होय.

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR (Empowered Autonomous) ESTD JUNE 1964

2] लिंगभाव म्हणजे स्त्री-पुरुषांच्या वर्तनाबाबतच्या सामाजिक अपेक्षा :

मानवी समाजात स्त्री-पुरुषांच्या वर्तनाबाबतच्या ठराविक सामाजि

Page No.
Date

अपेक्षा रूढ आहेत. जसे की, स्त्रियांनीच श्रृंगार करावा लाजावे स्वभावाने मृदु असावे मृदू बोलावे हसावे अंगमेहनतीची कामे करू नयेत तर याउलट पुरूषांनी लाजु नये, स्वभावाने कठोर असावे. धाडसी शौर्य हे पुरूषांच्या अंगी असावे अशा स्त्री-पुरूषांकडून वर्तनाची अपेक्षा समाज करत असतो साहजिकच या अपेक्षांमुळे स्त्री-पुरूषांचे जन्माला आल्यानंतर स्त्री किंवा पुरुष म्हणून समाजिकरण होत असते आणि त्या अनुषंगाने वैशिष्ट्ये निर्माण होत असतात व यामधूनच लिंगभाव ही संकल्पना निर्माण होत असते.

- लिंगभाव संकल्पनेचे स्वरूप :—

आतापर्यंत अभ्यासलेल्या व्याख्यांच्या आधारे आपणास लिंगभाव ही संकल्पना संज्ञा समजण्यास मदत झाली परंतु या संकल्पनेचा उगम कधी झाला हे पहाणे देखील क्रमप्राप्त ठरते.

साधारपणे 1955 या साली लिंगशास्त्रज्ञ जॉन मनी यांनी सर्वप्रथम लिंगभावविषयक भूमिका (Gender Role) ही संज्ञा 'सायंटिफिक ट्रेड जर्नल' या जर्नलमधील शोधनिबंधात वापरली होती. या शास्त्रज्ञाच्या मतानुसार लिंगभावविषयक भूमिका म्हणजे एखादी व्यक्ती ज्या गोष्टीबद्दल प्रकट होत असताना ती स्वतःस पुरुष किंवा स्त्री या दर्जानुसार प्रकट करते. त्यास 'लिंगभावविषयक भुमिका' असे म्हटले जाते.

अलिकडच्या काळात जेंडर (Gender) या नावाने प्रचलित असलेली संकल्पना प्राचीन काळापासून प्रचलित आहे. ॲरिस्टॉटल यांच्या मते भाषा व्याकरणात लिंग आधारित शब्द जसे की स्त्रीलिंगी, पुल्लिंगी आणि नपुसकलिंगी असे शब्द सर्वप्रथम ग्रीक तत्वज्ञ पायथागोरस यांनी इ.स पूर्व ८५० ते ७१० या काळात वापरली जेंडर Gender हा इंग्रजी शब्द सॅग्लोनार्मन आणि मध्ययुगीन फ्रेंच शब्द gndre पासून निर्माण झाला आहे तर gndre हा शब्द genus या लॅटिन शब्दापासून बनला आहे gndre आणि genus या शब्दाचा अर्थ प्रकार (kind, type) असा आहे. परंतु अलिकडे gender या शब्दाचा अर्थ प्रकार या अर्थाने वापरला जात नाही. या विवेचनावरून थोडक्यात असे म्हणता येईल की जेंडरचा व्युत्पत्तीशास्त्रीय अर्थ जो आजपर्यंत प्रकार या विवेचनावरून थोडक्यात असे म्हणता येईल की जेंडरचा व्युत्पत्ती-शास्त्रीय अर्थ जो आजपर्यंत प्रकार या अर्थाने घेतला जात होता तो अलिकडे स्त्री-पुरूषातील भेद दर्शविण्यासाठी निर्माण

केलेली सामाजिक वैशिष्ट्ये असा असून हे दोन्ही अर्थ परस्परांपेक्षा अगदी वेगळे आहेत याबरोबरच लिंगभाव ही संकल्पना सार्वत्रिक स्वरूपाची असून ती स्थळकाळापासून बदलणारी आहे. व्यक्तीच्या जन्मानंतर सामाजिकरणाच्या प्रक्रियेमधून लिंगभावविषयक भूमिका व्यक्तीला शिकविल्या जातात याबरोबरच लिंगभावाच्या समाजात रूढ असलेल्या पारंपरिक रूढीनुसार समाजात पुरुषाचे स्थान श्रेष्ठ तर स्त्रियांचे स्थान कनिष्ठ असा स्तरामध्ये स्त्री-पुरुषांचे स्तरीकरण होत असते.